(Reg.No.MAH/348/99) (Public Trust Reg.No.F6809 Nanded)
Sahayog Sevabhavi Sanstha's

# INDIRA INTERNATIONAL PUBLIC SCHOOL

UDISE : 27150107304

Ref.No. IIS/IIPS/ Date:

I, Dr. P. J. Wankhede, Principal, Indira International Public School, Vishnupuri, Nanded declare that the order released by Government of Maharashtra dated on 26 Feb. 2014, order no. SFS-1114/A NO. 40/SM-2 according to this order the govt. has permitted 1949 school and our school on 720 number.

The converted copy of order is also attached with this letter.

Principal
Indira International Public School
Vishnupuri, Nanded

Sahayog Educational Campus,
Vishnupuri, Nanded-431606 (M.S.)
Tel.02462-229013, Fax : 02462-2293..

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत....

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक एसएसएन-२०१४/प्र.क्र.४०/एसएम-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१४

**वाचा-**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाशाप्र-२००९/(६६३/०९)/ माशि-१, दिनांक २० जून, २०१२.

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमशा/स्वयंअर्थ/२०१३/६/७७५४/१५-३(७)/१२०११, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.

**प्रस्तावना-**

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा प्राथमिक, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासाठी, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७६० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२७७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४७३ | १५८ | ६३१ |
| एकूण | | २२७७ | १४८३ | ३७६० |

१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ - या सोबतच्या **विवरणपत्र- अ मध्ये** दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

१.२. अपात्र शाळा- नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या शाळांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीचे सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल.

२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबंधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे, अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्यांच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप **रद्दबातल** होईल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. ३० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता (Recognition)** घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (५०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)/शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळांना**

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,** २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाण्या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा**- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा**" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

(रा.ग.गुंजाळ)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

| | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ७१७ | नांदेड | स्वाती ग्रामीण विकास संस्था किनाळा ता. बिलोली जि. नांदेड | सावित्रीबाई फुले इंग्लिश मेडियम स्कूल रामतीर्थ ता.बिलोली जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७१८ | नांदेड | गुरुकृपा ग्रामविकास सेवाभाव संस्था सायखेड ता. सोनपेठ जि. परभणी | गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल दाभड ता. अर्धापूर जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७१९ | नांदेड | सना वेल्फेअर अँन्ड एज्युकशन संस्था नोमानियानगर चैतन्यनगर तरोडा बु. नांदेड | सना इंटरनॅशनल स्कूल ब्रम्हापूरी नांदेड ता.जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२० | नांदेड | सहयोग सेवाभावी संस्था विष्णुपुरी नांदेड | इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल विष्णुपुरी नांदेड ता.जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२१ | नांदेड | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान पूर्णा जि. परभणी | ब्लु लॉयन्स पब्लीक (CBSE) इंगजी माध्यम शाळा ईजळी ता. मुखेड जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक(CBSE) | इंग्रजी | पात्र |
| ७२२ | नांदेड | प्रियदर्शिनी ग्राम विकास मंडळ, सोंडवी ता.बिनवट जि. नांदेड | मिलेनियम मॉडेल स्कूल सांगवी (बु.) नांदेड ता.जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२३ | नांदेड | महात्मा फुले ग्रामीण विकास सेवाभावी संस्था सोनवळा ता. जळकोट जि. लातूर | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रायमरी स्कूल कंधार ता. कंधार जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२४ | नांदेड | जनकल्याण बहुउद्देशिय सेवाभावी संस्था धमणगाव ता. मुखेड जि. नांदेड | स्कॉलर किडस इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल मुखेड ता. मुखेड जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२५ | नांदेड | एज्युकेशन सोसायटी नायगाव बा. ता. नायगाव खु. जि. नांदेड | लिटील स्टेप इंग्रजी प्राथमिक शाळा शेलगाव ता. नायगाव खु. जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२६ | नांदेड | गंगाई सेवाभावी संस्था, लोहगाव ता.बिलोली जि. नांदेड | लिटल फलावर इंग्लिश स्कूल ता. नायगाव (खै) जि.नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२७ | नांदेड | गंगाई सेवाभावी संस्था, लोहगाव ता.बिलोली जि. नांदेड | राजमाता पब्लिक स्कुल लोहगाव ता. बिलोली जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२८ | नांदेड | जनकल्याण बहुउद्देशिय सेवाभावी संस्था धमणगाव ता. मुखेड जि. नांदेड | स्कॉलर किडस इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल वाजेगाव ता. जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| ७२९ | नांदेड | जवाहरलाल नेहरू शिक्षण समिती बरबडा ता. नायगाव खै जि. नांदेड | ज्ञानवर्धीनी प्राथमिक शाळा बरबडा ता. नायगाव (खै.) जि. नांदेड | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |

Maharashtra Self aided School (under self aided Act Rules 2012) for establishment regulation of new school upon principal as well as to upgrade the school for the academic year 2014-15

**Government of Maharashtra**

Department School Sport Education

Government Resolution No. SFS-1114/a No. 40/SM-2

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk

Mantralaya, Mumbai-400 032

Dated 26 Feb. 2014

Read :

1) Government Resolution, Department of School Education and Sport No. NHP- 2009/(663/2009)MASHI-1 dated 20 June 2012.
2) Letter No. AMASHA/Swaym Arth/2013/60454/15/C(5)/ 2019 dated 24 Dec. 2013.

**Preface :**

To invite application for self aided school under (Establish and Regulation) 2012 for grant of permission under the principle to establish school, upper primary school, secondary and High School, as well as the upgrade the school. The Maharashtra Self aided school (Establish and Regulation) Act 2012 (01 of the 2013) has been passed and is came in to force for the academic year 2013-14. The detail procedure has been let down by the Government Resolution dated 20 June 2012 for grant of permission to the interested non granted English medium school who wish to join CBSE, ICSE, IB, IGCSC, CIE,

Invitation of application on dated 08 August 2013 for approval of new private school and to upgrade the existing school for the year 2014-15. It is up to the

Government to Scrutinize these proposal and to take further action on eligible proposal was under consideration. Considering all issues, the Government has taken the following decision.

**Government Decision**

1) Maharashtra self aided school (Establishment and Regulation) Act, 2012 (01 of 2013). Out of the total 3700 proposal received for the academic year 2014-15 Government approving 2217 proposal.

| Sr. No. | Classification | Eligible proposal | Uneligible proposal | Total proposal |
|---|---|---|---|---|
| 1 | Proposal of new school accreditation | 1804 | 1325 | 3129 |
| 2 | Proposal for upgrading school | 413 | 158 | 571 |
| | **Total** | 2217 | 1483 | 3700 |

1.1 **Permission of new school and upgraded-** school the Government Granting permission to said school for academic year 2014-15 as shown in statement-A to establish new school and to upgrade the existing school.

1.2 **Ineligible school** – the proposal of schools declare as in ineligible regarding establishment of new school or upgrading the existing school will be personally inform to the concern institution through district scrutiny Committee member or Secretary.

2. **Government permission/ Terms and conditions for up gradation of schools.**

2.1 The primary and upper primary school shall require to comply with all the rules and provisions made under. The right to free and compulsory education of childer Act 2009.

2.2 The permission is given to the concern school management to start the school in the Academic year 2014-15 in compliance with the provision of the act 2009

a) The management which has fulfilled all the requirement as per the prescribed rules of Government for setting-up or upgrading the school should apply to the concern district Education Officer for first approval within one month from the commencement of academic year.

b) Those managements which are eligible as per Government order for the year 2014-15, if such management do not have all requirements as per the Government Rules and Regulation for establishment of new school or to upgrade the school, such management should apply for comply within 18 month from Government Resolution, otherwise permission will be automatically revoked.

c) The concern CBSE, ICSE, IB, IGSE and CIE etc. related interested schools and institutions should first obtain no objection certificate for recognition as per the Rules Government Resolution dated 20 June 2012. After obtaining said recognition as per paragraph No. 10 of said Government order. The District Education Officer (primary) / District Education Officer (Secondary)/ Education Inspector Grater Mumbai. The concern institution will apply for no objection from Board along with permission letter. After scrutiny the concern school will be given no objection certificate with the terms and conditions imposed.

2.3 The permission to the new school of upgraded school as per the list accompanying statement

i) As per the order and procedure issued by Government from time to time as well as

ii) It will be mandatory to comply with all the provisions of Maharashtra Self aided school (Establishment and Regulation) Act 2012 (01 of the 2013)

2.4 The responsibility is upon to Deputy Director Education to communicate this order to all the managements / institutions within 15 days of the said order.

2.5 The concern officers after first ensure regarding compliance as per regulation 2009 and thereafter take further action for preliminary grant.

2.6 No charge shall be made in the future in medium and place etc. for which the school is permitted. If the school is started in a place other than the place for which Government has given permission, the given permission will be revoked.

2.7 At the time of filing information regarding District wise U-DISE (Unified District Information System for Education) regarding new school / upgraded school permitted by U-data to self aided permitted school should obtained number by registering separate category at self aided school is responsibility of concern institution. The state project director of Maharashtra Primary Education council, Mumbai is being declared as nodal officer for further action in this regard. Similarly for the information of all consent the organization has posted a public notice on the school notice board of self aided new permission granted school /

upgraded permitted school. This Government Resolution has been made available on the website of the Government of Maharashtra www.maharashtra.gov.in and its code is 201402281124019921. This order is being attested with digital signature by order in the name of Government of Maharashtra.

By the order and name of Governor of Maharashtra.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=school Education & Sports dept, postal code=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Dated : 2014.03.01 11:46 [illegible]

**Copy to**

1) Commissioner, School Education, State of Maharashtra Pune
2) Commissioner of all municipal Corporation.
3) Chief Executive of all Zilla Parishad.
4) Director, General Director of information and public relations, Mantralaya Mumbai.
5) State Project, Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai.
6) Director of Education (Secondary and Higher Secondary) Maharashtra State, Pune.
7) Director of Education (Primary) State of Maharashtra.
8) All directors under the department.
9) Deputy Directors of Divisional Education.
10) Education officer of Zilla Parishad (Primary / secondary)

| Sr. No. | District | Name & address of institution | Proposed school name and Place | New school / upgrade | Type | Medium | Final decision of the Govt. Considering the recommendation of scrutiny committee and the objections/ suggestions/ objection received in that regard |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 717 | | | | | | | |
| 718 | | | | | | | |
| 719 | | | | | | | |
| 720 | Nanded | Sahyog Sevabhavi Sanstha Vishnupuri Nanded | Indira International Public School Vishnupuri Nanded Tq. & Dist. Nanded | New school | Primary | English | Eligible |
| 721 | | | | | | | |
| 722 | | | | | | | |
| 723 | | | | | | | |
| 724 | | | | | | | |
| 725 | | | | | | | |
| 726 | | | | | | | |
| 727 | | | | | | | |
| 728 | | | | | | | |
| 729 | | | | | | | |